
पारावरच्या गप्पा

# कृषी पर्यटन देईल शेती व्यवसायाला आधार...



नित्यनियमाप्रमाणे देवदर्शन घेऊन गणपत पारावर येऊन बसला होता. संपतही देवदर्शन घेऊन गणपतजवळ येत म्हणाला, ''काय गंपा, जरा झोपत का नाही उन्हाचा?''

यावर गणपत म्हणाला, ''आरं संपा, यावर्षी तर सूर्यदेव नुसती आग ओकत होता. अंगाची लाही लाही केली बघ या वर्षीच्या उन्हाळ्याने. आता थोडेसे बरे वाटतेय. मला तर कळतच नाही, याप्रमाणे उन्हाळा वाढत गेला तर पुढे कसे व्हायचे आपल्या शेतीचे? यावर्षीच्या उन्हाळ्यामुळे कांदा, गहू, उन्हाळी सोयाबीन या पिकांचे उत्पादन तर चांगलेच घटले आहे. असे उत्पादन घटत गेले तर पुढे कसे होणार तेच कळत नाही. एक तर मागील दोन-तीन वर्षात खते, औषधे, मजूर, मशागत, बियाणे यांच्या किंमती भरमसाठ वाढल्या आहेत. त्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. मात्र शेतीमालाचे तर आहेत तेच भाव! कांदा तर तोट्यातच जातो असे वाटते; ऊसाचे उत्पादनही कमी आले. थोडीफार मदत झाली ती कापूस आणि सोयाबीनमुळे. म्हणून संपा, काहीतरी मार्ग काढायला पाहिजे बघ, नाही तर शेती सोडून कोठेतरी बाहेर कामाला जायची पाळी येईल.''

यावर संपत हसत म्हणाला, ''आरं गंपा, तू एवढा घायकुतीवर येऊ नको. काहीतरी निघेल यातून मार्ग. पिकापासून नाही फायदा झाला तरी शेतीपूरक काहीतरी उद्योगधंदा केला तर त्याचा आधार होईल शेतीला. आजपर्यंत नाही का दुग्धव्यवसाय, कोंबडीपालन, शेळीपालन, रेशीम उद्योग, फलोत्पादन यासारख्या व्यवसायांची जोड देऊन आपण शेती फायद्याची केली?''

संपतला मध्येच थांबवत गणपत म्हणाला, ''हे बघ संपा, तू सांग दूध धंद्याचे काय झाले? मध्ये दुधाला भाव नाही म्हणून शेतकऱ्यांची वाट लागली आणि आता भाव आहे तर खाद्य- चाऱ्याचे भाव गगनाला भिडले. त्यामुळे दुग्ध व्यवसायसुद्धा फार आधार देत नाही बघ आपल्याला. बाकीच्या व्यवसायांचेही थोड्याफार फरकाने तसेच आहे बघ! संपा, मी मागच्या महिन्यात वाचलंय, काहीतरी जागतिक पर्यटनदिनानिमित्त बातम्या आल्या होत्या की शेतकरी तसेच ग्रामीण विकासासाठी कृषी पर्यटन फायदेशीर ठरेल म्हणून. त्यात लिहिलं होतं की शेतकऱ्यांनी कृषी पर्यटन हा शेतीपूरक व्यवसाय म्हणून सुरू करावा. मला तर काहीच कळले नाही पण तू आता विषय काढला म्हणून विचारतो, काय भानगड आहे ही? कृषी पर्यटन हा शेतकऱ्याचा व्यवसाय कसा होऊ शकतो?''

यावर हसत संपत म्हणाला, ''कृषी पर्यटन म्हणजे शहरातील किंवा दुसऱ्या भागातील माणसे आपल्या गावात- शेतात येतील. येथे येऊन थांबतील, आपल्या सर्व कार्यपद्धती बघतील. त्यातून त्यांचा वेळ चांगला जाईल, त्यांना आनंद होईल. त्या बदल्यात ते आपल्याला पैसे देतील. म्हणजेच आपल्याला आपल्या शेतीच्या उत्पादनाबरोबरच आलेल्या पाहुण्यांकडूनही पैसे मिळतील.''

डोक्याला हात लावून गणपत म्हणाला, ''काहीतरी काय बोलतो संपत! एक तर आपण फिरायला जायचे म्हटले तर देवदर्शन, गड-किल्ले, समुद्र किंवा एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जातो. सर्वच जण अशा ठिकाणी जाण्याला प्राधान्य देतात. आपण फिरायला शहरात जातो. मग हे शहरातील लोक खेड्यात कशाला येतील? काय ठेवलंय आपल्या खेड्यात त्यांना पाहायला?''

मध्येच गणपतला थांबवून संपत म्हणाला, ''हे बघ गंपा, तू म्हणतो ते काही प्रमाणात खरं आहे आणि काही प्रमाणात खोटं आहे. आता तू सांग ही शहरात राहणारी माणसं कोठून गेली आहेत शहरात? आपलीच मुलं, नातेवाईक, खेड्या-पाड्यांतील लोक गेले आहेत नोकरीच्या शोधात शहरात. म्हणजे शहरात गेले ते काही आताच गेलेले नाहीत. दोन-तीन पिढ्यांपूर्वी गेले आणि भविष्यात अजूनही जातील. ते गावातून शहरात गेले, तिथे ते नोकरी करतात. शहरात राहण्यासाठी जास्त पैसा लागतो म्हणून जास्त काम करतात. या कामातून विरंगुळा म्हणून त्यांना बाहेर फिरायला जावेसे वाटते. तू म्हणतो तसे देवदर्शन, समुद्रकिनारा, गडकिल्ले, निसर्गरम्य ठिकाणाला ते जातात. परंतु एक लक्षात ठेव आजही त्यांची पाळेमुळे खेड्यात आहेत. गावाची ओढ त्यांनाही आहे. गावात जास्त दिवस राहायला नाही आवडणार, परंतु एक-दोन दिवस तर नक्कीच आवडेल त्यांना. दुसरी म्हत्त्वाची गोष्ट म्हणजे आज शहरातील जी नवी पिढी तयार होत आहे तिला दररोजच्या आहारामध्ये असलेले अन्नपदार्थ नेमके कोठून येतात तेच माहीत नाही. दूध कोठून येते, शेंगदाणे कसे पिकवितात, तेल कसे तयार होते, मध कोठून मिळतो, गव्हाचे पीठ कसे तयार होते, कोंबडीसारखे प्राणी अंडी कशी देतात, फळे कोठे येतात यासारख्या गोष्टी त्यांना फक्त चित्रातच बघायला किंवा वाचायला मिळतात. हीच गोष्ट त्यांना प्रत्यक्ष बघायला मिळाली किंवा प्रत्यक्ष हाताळता आली तर किती चांगले वाटेल! शहरातील ज्येष्ठ नागरिकांनाही शहरामध्ये राहून कंटाळा येतो. त्यांनाही गावातील वातावरणामध्ये जावे असे वाटते. म्हणजेच कृषी पर्यटन ही आबालवृद्धांना- म्हणजेच ज्येष्ठ नागरिकांपासून ते लहान मुलांपर्यंत सर्वांनाच आकर्षित करणारी गोष्ट आहे बघ. आता समजा शहरातील कुटुंबाने ठरविले की आपण फिरायला जायचे तर आजोबा म्हणतात- देवदर्शनाला जाऊ, आईवडील म्हणतात कुठेतरी गड- किल्ले बघायला जाऊ तर मुले म्हणतात समुद्रकिनारा किंवा ट्रेकिंग; अथवा बर्फ पडणाऱ्या भागात जाऊ. फिरायला जायच्या ठिकाणावरून घरातील तिन्ही पिढ्यांमध्ये मोठी चर्चा किंबहुना वादही होतात. पण कृषी पर्यटनाचा विचार केला तर तीनही पिढ्यांना आवडेल असे हे ठिकाण आहे. अर्थात तीनही पिढ्यांचा विचार करूनच आपल्याला कृषी पर्यटनामध्ये वेगवेगळ्या आकर्षक सोयीसुविधा द्याव्या लागतील. ते कृषी पर्यटन केंद्रात आले म्हणजे त्यांना शेती तसेच ग्रामीण भागाची माहिती होईल, त्यांचे मनोरंजन होईल. भारतीय ग्रामीण संस्कृती जवळून बघायला मिळेल, शेतातील ताजा भाजीपाला, फळे घेता येतील आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे ग्रामीण पद्धतीच्या स्वादिष्ट भोजनाचा आस्वादही घेता येईल.''

संपत या सर्व बाबी सांगत असताना गणपतने आणखी त्याच्याकडे सरकून विचारले, ''कारं संपा, तू हे म्हणतो ते सर्व होईल पण या लोकांना आपल्याकडे मुक्कामाची सोय करणे, त्यांच्या जेवणासाठी त्यांच्या पद्धतीने सोय करणे आणि त्यांचा पाहुणचार करीत बसणे यासाठी तर मोठा खर्च येईल. म्हणजे आपण लाखो रुपये खर्च करून पर्यटन केंद्र उभे करायचे आणि बसायचे यांची वाट पाहात. नाही आले तर बुडाले का सर्व पैसे!''

संपत हसतच गणपतचा हात धरत म्हणाला, ''हे बघ तुला ना एखादी गोष्ट सांगितली आणि पटली की लगेच मोठी उडी घ्यायचा प्रयत्न करतो तू! हे पर्यटन केंद्र म्हणजे काही मोठ्या बिल्डिंग बांधायच्या नाहीत आपल्याला. आता बघ, आपली पोरं शहरात जातात. तेथे पेईंग गेस्ट म्हणून राहतात. अरं पेईंग गेस्ट म्हणजे घरमालकाच्या घरामध्येच दोन-तीन खोल्या असतात. या खोल्यांमध्ये आपली मुलेमुली भाड्याने राहतात. ते त्यांचे पाहुणे- म्हणजे पैसे देऊन राहिलेले पाहुणे- अर्थातच पेईंग गेस्ट. तसंच करायचं बघ आपण. आपल्याकडेही घरातील

२-३ खोल्या ठेवायच्या वेगळ्या. तिथे राहतील पाहुणे. त्यांच्या जेवणाचे म्हणशील तर आपण ज्याप्रमाणे ग्रामीण पद्धतीने जेवण करतो तसेच त्यांनाही जेऊ घालायचे. आपल्याकडील काही विशिष्ट पदार्थ किंवा आपल्या घरची मंडळी जे जेवण चांगले बनवितात तेच पाहुण्यांना खाऊ घालायचे. त्यांना आपले शेत फिरून दाखवायचे. त्यांची इच्छा असेल तर आपल्या शेतातील कामामध्ये त्यांनाही सहभागी करून घ्यायचे. शेतीतील फळे- भाजीपाला त्यांना पाहिजे असेल तर त्यांच्या पद्धतीने घेऊ द्यायचा, अर्थात पैसे घेऊन! आपल्या शेतात किंवा गावात काही विशेष शेती उत्पादन असेल तर तेही विक्रीसाठी ठेवायचे. लहान मुलांना ग्रामीण खेळ किंवा इतर करमणुकीची साधने उपलब्ध करून द्यायची. नदी- कॅनॉल असेल तर त्यांना पोहायला घेऊन जायचे. गट असेल तर डोंगरावर फिरायला घेऊन जायचे. गावात कीर्तन- भजन, जागरण- गोंधळ असेल तर त्यांच्या इच्छेनुसार तेथे घेऊन जायचे किंवा आपल्याकडे असा काही कार्यक्रम करायचा. अशा प्रकारचे अनेक कार्यक्रम करून त्यांचे मनोरंजन कसे होईल यासाठी प्रयत्न करायचे.''

यावर गणपत हसत म्हणाला, ''आरं वा संपा, हे सर्व असेल तर दिवस- कसा जाईल हे कळणार पण नाही. पण कारं संपा, आपली शेती सोडून हेच काम केले तर शेती कोण करेल?''

यावर हसत संपत म्हणाला, ''आरं गंपा हे सर्व एकाच माणसाने करावं असं नाही. समजा माझ्याकडे पैसा आहे आणि भरपूर जागा आहे- तर मग मी मोठ्या प्रमाणात या सोयीसुविधा निर्माण करेन. ज्यावेळी पर्यटक येतील, माझ्याकडे एखादा दिवस राहतील- त्यांना नवनवीन गोष्टी पाहायच्या, शिकायच्या असतील, नवनवीन लोकांना भेटायचे असेल. अशा वेळी माझ्याकडे तुझ्यासारख्या अनेकांची सविस्तर माहिती असेल. ती माहिती माझ्याकडून घेऊन, त्यातून त्यांच्या आवडीनुसार ते तुमच्याशी संपर्क करतील. माझ्याकडे पन्नास माणसे राहाण्याची सोय असेल तर तुमच्याकडे ५-१० माणसेच राहू शकतील. म्हणजेच माझ्याकडील ५० जणांचे पाच- दहा लहान लहान गट कृषी पर्यटन केंद्राला भेट देतील. या केंद्राचे अंतरही ५-१० कि.मी.च्या आत असेल. माझ्या पर्यटन केंद्रात त्यांच्या मनोरंजनाची मोठ्या प्रमाणात सोय असेल. त्यासाठी स्वतंत्र काम करणारी माणसे असतील. आता तुझ्यासारख्याने लहान केंद्रावर माणसे ठेवण्याची गरज नाही. समजा तुझ्याकडे शेळ्यांचा गोठा आहे- पर्यटकांना शेळ्यांसोबत दिवस घालवायचा आहे, शेळी पालनाबद्दल सविस्तर ज्ञान घ्यायचे आहे, त्यांचा चारा- खाद्य, त्यांना फिरविणे यासारख्या गोष्टी पाहुण्यांना स्वत: कराव्याशा वाटल्या आणि त्यांनी केल्या तर त्यांचा संपूर्ण दिवस यात जाईल. याप्रमाणेच काहींकडे द्राक्ष, डाळिंब, दुग्ध व्यवसाय, कोंबडी पालन, रेशीम उद्योग, पॉलिहाऊस, भाजीपाला, मधमाशी पालन, प्रक्रिया उद्योग, महिला गृहउद्योग अशा विविध गोष्टी असतात. आता आलेले पाहुणे निवडतील की त्यांना नेमके काय पाहायचे आणि कोणासोबत दिवस घालवायचा आहे ते म्हणजेच आपण आपले शेतीचे काम सोडून न देता त्यांनाही या कामामध्ये सहभागी करून घ्यायचे. तेच काम करत करत पर्यटक या साऱ्या गोष्टींचे ज्ञान घेतील. शहरातून किंवा इतर ठिकाणाहून आलेले पाहुणे त्यांच्याकडील तेच तेच काम करून कंटाळलेले असतात त्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनात काहीतरी बदल पाहिजे असतो. तो अनुभव त्यांना आपल्याकडे आल्यावर आपल्या शेतावरच मिळवून द्यायचा. आनंदी जीवनासाठी कृषी आणि ग्रामीण पर्यटनाचा मार्ग त्यांना एकदा कळला की मग आपोआपच त्यांची पावले आपल्या शेताकडे वळतील बघ. याबद्दल ते आपल्याला पैसे देतील. अर्थात आपण काय शहरातल्या हॉटेलांसारखे जास्त पैसे नक्कीच घेणार नाही. त्यामुळे त्यांचीही कमी पैशात राहण्याची आणि जेवणाची सोय होईल आणि आपल्यालाही शेतीला यामुळे आधार मिळेल.''

संपतच्या या सर्व माहितीने गणपतला एक उभारी आली. तो म्हणाला, ''हे बघ संपा, मी आता घरी गेलो ना मग बायको- पोरांबरोबर चर्चा करून आपल्यालाही अशा प्रकारचा छोटा उपक्रम सुरु करता येईल का ते पाहतो. तूही आणखी लोकांशी बोल. कारण तुझे ते ऐकतात. आपण जर ५-६ जणांनी मिळून कृषी पर्यटन केंद्र सुरू केले तर नक्कीच फायदा होईल बघ! पाहिजे तर आपण कोठेतरी जाऊन हे बघून येऊ. ज्यांची इच्छा असेल ते सर्व जण एकत्रच कृषी पर्यटन केंद्रात जाऊन तेथे काय चालते ते बघून येतील. त्यांच्याकडूनही माहिती घेऊ. चल आता बराच वेळ झाला. चहा घेऊ आणि लागू कामाला.'' **(सौजन्य : 'पूर्वा कृषिदूत' परिवार)**

■